**नियमित दिवाणी दावा क्र.२९५/२०२२**
सुनिता विठ्ठल भिसे
वि.
मुरलीधर रामभाऊ ज–हाड व इतर
MHAH190011012022

**आदेश निशाणी क्र.५१ खाली**

१. प्रतिवादी क्र.०३ चे वारस प्रतिदाव्यात अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होणे करीता प्रतिवादी क्र.०१ ने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार प्रतिवादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड हे दि.२०/०१/२०२५ रोजी मयत झाले आहे. त्यांचे मृत्यूप्रमाणपत्र सोबत दाखल केले आहे. त्यांचे पश्चात त्यांचे वारसांना प्रतिदाव्यात सामील करणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवादीचे पुढे कथन आहे की, अर्जदार प्रतिवादी हे आजारी असल्याचे कारणामुळे त्यांना दरम्यानचे काळात मयत प्रतिवादी क्र.०३ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला आहे. त्यामुळे मुदतीमध्ये प्रतिवादीस सदरचा अर्ज दाखल करता आलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.०३ चे वारस प्रतिदाव्याच्या अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी व त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. वादी तर्फे खुलासा मागविण्यात आला. वादी यांनी सदर अर्जावर निशाणी क्र.५६ अन्वये म्हणणे दाखल केले की, प्रतिवादींचा अर्ज कायदेशिर तरतुदीस अनसुरुन नाही तसेच अर्जातील करण हे संयुक्तिक नाही. त्यावरुन त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. वादी व प्रतिवांदीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध दस्तांची बारकाईने अवलोकन कले. प्रतिवादीने अभिलेखावर प्रतिवादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड यांचे मृत्यूप्रमाणपत्राची प्रत दाखल केली. त्यानुसार महादेव मुरलीधर ज–हाड यांचे दि.२०/०१/२०२५ रोजी निधन झाल्याचे दिसुन येते.

५. वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई हुकूम आदेशाकरीता

प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.०१ ने निशाणी क्र.२० वर त्याची कैफियत व प्रतिदावा दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड यांचा मृत्यू दिनांक २०/०१/२०२५ रोजी झाला परंतु, अर्जदार प्रतिवादी हे आजारी असल्याने त्यांना न्यायालयात हजर राहुन मयत प्रतिवादींचे वारस प्रतिदाव्याच्या रेकॉर्डवर घेण्यास उशिर  झाला व प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दिनांक १०/०९/२०२५ रोजी दाखल केलेला आहे. मुदत कायदा अर्टिकल १२० नुसार वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी नव्वद दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. मृत्यू दिनांक २०/०१/२०२५ नंतर दिनांक १९/०४/२०२५ पर्यत वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. परंतु अर्ज दि.१०/०९/२०२५ रोजी दाखल केला आहे म्हणजेच ४ महिन्यांपेक्षा जास्त विलंब झाल्याचे दिसते.

**६.** प्रतिवादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड मयत झाले असले तरी त्यांच्या वारसांना प्रतिदावा दाखल करण्याचा हक्क टिकुन आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट प्रतिदावा परिपूर्णपणे व गुणवत्तेवर निकाली निघण्यासाठी वारस प्रतिदाव्याच्या रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे झालेला विलंब देखील बेसुमार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. निशाणी क्र.५१ वरील अर्ज रक्कम रु.२००/– च्या कॉस्टवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादीस कॉस्टची रक्कम द्यावी.

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.13 15:48:53 +0530

दि.०९/०३/२०२६

( वैशाली सं. मोरे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ,
शेवगाव.